महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७
ई -मेल-dokh.rfd@maharashtra.gov.in

क्रमांक:-गौखनि-३३/०८१४/प्र.क्र.४२७/ख
महसूल व वन विभाग,हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०३ ऑगस्ट,२०१९.

विषय:- गौण खनिज-अहमदनगर
सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता मौजे अनगरे, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर या वाळूगटाच्या लिलावापोटी शासनजमा केलेली रक्कम परत करणेबाबत.
श्री.स्वामी समर्थ एंटरप्रायजेस श्री.आदेश भूजंगराव नागवडे

शासन ज्ञापन :-

सन २०१७-१८ या वर्षाकरीता मौजे अनगरे, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर या वाळूगटातील ३४८८ ब्रास वाळूचा लिलाव रु.१,०४,४२,६०८/- इतक्या सर्वोच्च बोलीस श्री.स्वामी समर्थ एन्टरप्रायजेस तर्फे श्री.आदेश भुजंगराव नागवडे यांना मंजूर करण्यात आला होता. त्यानुसार लिलावधारकाने रक्कम रु.१,०४,४२,६०८/- इतकी रक्कम चलनाद्वारे शासनजमा केली होती.

०२. तथापि, शासन निर्णय दि.०३.०१.२०१८ नुसार वाळू/रेती निर्गती सुधारीत धोरण विहित केल्यानुसार, वाळूगटास पर्यावरण अनुमती घेण्यापूर्वी खाणकाम आराखडा तयार करणे बंधनकारक केले आहे. तथापि, सदरचा लिलाव हा दि.०३.०१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये रेती/निर्गतीबाबतचे सुधारीत धोरण जाहिर करण्यापूर्वी केला होता. परंतु, मा.हरित न्यायाधिकरण यांचेकडील अपील क्र.९१/२०१७/ WXMA-२८९/२०१७, एम झेड एंटरप्रायजेस, नागपूर विरुध्द डिस्ट्रीक्ट लेवल DIAA नागपूर या अपिलामध्ये दि.२२.११.२०१७ च्या आदेशान्वये लिलाव झालेल्या वाळूस्थळामधून वाळू उत्खनन करणेपूर्वी खाणकाम आराखडा मंजूर करुन घेणे बंधनकारक करण्यात आलेले असल्यामुळे, लिलावधारक यांनी खाणकाम आराखडा तात्काळ संबंधित प्राधिकृत व्यक्तींकडून तयार करुन जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा, त्यानंतर सदर वाळू लिलावाच्या मंजूरीसाठी जिल्हास्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण यांची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्षात वाळू उत्खनन सुरु करावे. अन्यथा आपणाविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या दि.११/०१/२०१८ च्या पत्राच्या अनुषंगाने लिलावधारक श्री.स्वामी समर्थ इन्टरप्रायजेस श्री.आदेश भुजंगराव नागवडे यांना कळविले होते.

०३. त्यानुसार लिलावधारक श्री.आदेश भुजंगराव नागवडे यांनी त्यांच्या दि.२३.०१.२०१८ च्या पत्रान्वये केलेल्या खुलाश्यात असे नमुद केले की, "जिल्हाधिकारी कार्यालयाने लिलाव करण्यापूर्वी लिलावासाठी ठेवण्यात येणाऱ्या वाळू साठ्याचा खाणकाम आराखडा तयार करुन त्यास पर्यावरण विभागाची मान्यता घेणे आवश्यक असतांना तसे न करता वाळू साठ्याचे लिलाव करणे, ही बाब शासन निर्णयातील तरतुदीस अनुसरुन नाही. त्यामुळे मला दिलेले पत्र बेकायदेशीर व नियमबाह्य आहे. वाळू क्षेत्राचा खाणकाम आराखडा हा वाळू लिलाव करणेपूर्वीचे करावयाचा आहे. सबब, मी मौजे अनगरे, ता.श्रीगोंदा येथील वाळू लिलावाचे पैसे भरलेले असल्याने वाळू क्षेत्राचा खाणकाम आराखडा करणार नाही. तसेच वाळू लिलावाच्या करारनाम्यात वाळूगटाचा खाणकाम आराखडा करणेबाबत कोठेही नमूद केलेले नाही. तसेच दि.०९.०१.२०१८ च्या पत्रानुसार सदर वाळूगटातून मी वाळूचे उत्खनन करत नसल्याचे कळविले आहे. सबब वाळू साठ्यातून वाळू उत्खननास स्थगिती असल्यामुळे सदर वाळू लिलावाचे भरलेले पैसे त्वरीत मिळावेत अशी विनंती केली आहे.

०४. सदर प्रकरण शासनाच्या विचाराधीन असता, लिलावधारक यांनी लिलावाची रक्कम परत मिळण्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.५४४५/२०१८ दाखल केली. "सदर प्रकरणी लिलावधारकास वाळू लिलावापोटी भरलेली रक्कम रु.१,०४,४२,६०८/- ही तीन

महिन्यात परत करण्यात येईल," असे विधान सरकारी वकील यांनी मा.उच्च न्यायालयात केल्याने मा.उच्च न्यायालयाने दि.१९/०९/२०१८ रोजी सदर विधान ग्राह्य धरुन उक्त याचिका खारीज केली. तथापि, उक्त कालावधीत रक्कम परत करण्याबाबतचे शासनाकडून आदेश पारित न झाल्याने लिलावधारक यांनी मा.उच्च न्यायालय येथे अवमान याचिका दाखल केली आहे.

०५. उक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन लिलावधारक श्री.स्वामी समर्थ इन्टरप्रायजेस श्री.आदेश भुजंगराव नागवडे यांना मौजे अनगरे, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर या वाळूगटातील ३४८८ ब्रास वाळूच्या लिलावापोटी रु.१,०४,४२,६०८/-(रुपये एक कोटी चार लक्ष बेचाळीस हजार सहाशे आठ फक्त) इतकी शासनजमा केलेली रक्कम परत करण्यास वित्त विभागाने सहमती दर्शविली आहे.

०६. सबब लिलावधारक श्री.स्वामी समर्थ इन्टरप्रायजेस श्री.आदेश भुजंगराव नागवडे यांनी लिलावाची संपूर्ण रक्कम प्रत्यक्षात शासनाकडे जमा केल्याची व यापुर्वी ही रक्कम अदा केलेली नाही, याची खातरजमा करुन घेण्याच्या अटीवर लिलावधारक यांना रुपये रु.१,०४,४२,६०८/- (रुपये एक कोटी चार लक्ष बेचाळीस हजार सहाशे आठ फक्त) इतकी रक्कम अदा करण्यास या शासन ज्ञापनाद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

०७. या बाबीवर होणारा खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता "०८५३-अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग" १०२-खनिजाबाबत सवलत फी व स्वामित्वधन,९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग-वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीतूमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

०८. सदर शासन ज्ञापन, वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १५५/२०१९/व्यय-०९, दिनांक ०८/०४/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०८०३१६५११३१५१९ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh Rohidas Chavan

Digitally signed by Dinesh Rohidas Chavan
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0edee7a8805e86e41846cf28cf151b9ce48bb88ebf4f2e8a7fc10e8dcad98ec, serialNumber=8c2377ed235498603821d49922a210871ff6fb9b369722ac707aee7dcd87f2bd, cn=Dinesh Rohidas Chavan
Date: 2019.08.03 17:00:54 +05'30'

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

जिल्हाधिकारी, अहमदनगर

प्रत:-

१) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई-४०० ०२०.
३) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई-२०.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर
५) वित्त विभाग (व्यय-९/अर्थसंकल्प-३/६/१४ कार्यासने) मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६) कार्यासन अधिकारी (कार्यासन ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७) निवडनस्ती (कार्यासन "ख"), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.